## गुन्हेगारी वृत्त

### पिंपळे सौदागर येथून कोयत्यासह तरुणाला अटक

**पिंपरी :** अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक विभागाने एका तरुणाला कोयत्यासह अटक केली. ही कारवाई शुक्रवारी (दि.१७) दुपारी पावणे दोन वाजता पिंपळे सौदागर येथील स्वराज चौकात करण्यात आली.अभिषेक भगवान मोहिते (वय २१, रा. पिंपळे सौदागर) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. याप्रकरणी पोलीस हवालदार सुनील शिरसाट यांनी सांगवी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पिंपळे सौदागर येथील स्वराज चौकात एकजण शस्त्र घेऊन आला असल्याची माहिती अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक विभागाला मिळाली. त्यानुसार पोलिसांनी सापळा लावून अभिषेक याला ताब्यात घेतले. त्याची झडती घेतली असता त्याच्याकडे २५० रुपये किमतीचा एक कोयता आढळून आला. सांगवी पोलीस तपास करीत आहेत.

### कत्तलीसाठी जनावरे पळवणाऱ्या मुंबईच्या टोळीवर मोक्का

**पिंपरी :** कत्तलीसाठी जनावरे पळवणाऱ्या मुंबईच्या टोळीवर पिंपरी-चिंचवड पोलिसांनी मोक्का ची कारवाई केली आहे. मोशीन बाबू कुरेशी, शाहिद रहेमान कुरेशी, मोहम्मद अब्दुल रहमान कुरेशी, आशराफ सलमान कुरेशी, मोहम्मद आरिफ सलमान कुरेशी, सोहेल फारूक कुरेशी, राहुल पंडित उर्फ राहुल भैया उर्फ राहील महम्मद कुरेशी, मोशीन शरीफ कुरेशी, जाफर सुजितकुमार सुभाषचंद्र पाणीग्रही अशी मोक्काची कारवाई झालेल्या आरोपींची नावे आहेत.मुंबईची एक टोळी रात्रीच्या वेळी पुणे जिल्ह्यात येऊन इंजेक्शन देऊन बेशुद्ध करत जनावरांची चोरी करीत असे. या टोळीला पकडण्यात दिघी पोलिसांना यश आले आहे. एका कारच्या क्रमांकावरून तपास सुरु करून दिघी पोलिसांनी मुंबई, ठाणे आणि पुणे परिसरातील विविध भागात पाठलाग करून नऊ आरोपींच्या मुसक्या आवळल्या. त्यांच्याकडून २५ लाख २० हजार ९८० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या कारवाईमध्ये १४ गुन्हे उघड झाले आहेत. आरोपींचा खुनाचा प्रयत्न, दंगल, गाईंची चोरी, तस्करी अशा एकूण २९ गुन्ह्यांमध्ये समावेश आहे. त्यामुळे आरोपींवर मोक्का अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे.

### दहावीचा पेपर देऊन आलेल्या विद्यार्थ्यासह तिघांना मारहाण

**पिंपरी :** दहावीच्या परीक्षेचा पेपर देऊन आलेल्या विद्यार्थ्यासह तिघांना पूर्ववैमनस्यातून मारहाण करण्यात आली. तळेगाव दाभाडे येथील एका शाळेच्या गेटसमोर बुधवारी (दि. १५) दुपारी दीडच्या सुमारास हा प्रकार घडला. याप्रकरणी एका १७ वर्षीय मुलाने गुरुवारी (दि. १६) तळेगाव दाभाडे पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार आठ जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी हे मित्रासह शाळेच्या गेटसमोर गेले. त्यावेळी दहावीच्या बोर्डाच्या परीक्षेचा पेपर देऊन शाळेबाहेर आलेल्या त्यांच्या मित्राला आरोपींनी जुन्या भांडणाचा राग मनात धरून मारहाण केली. तसेच फिर्यादी व त्यांच्या मित्राला देखील मारहाण केली. यात फिर्यादीसह तिघेही गंभीर जखमी झाले आहेत. तळेगाव पोलिस तपास करत आहेत.

### दुचाकीस्वाराच्या मृत्यूप्रकरणी एक महिन्यानंतर गुन्हा

**पिंपरी :** नाशिक-पुणे महामार्गावर दुचाकीच्या धडकेने एकाचा मृत्यू झाला. भोसरीतील जयगणेश साम्राज्य चौकात १६ फेब्रुवारी २०२३ रोजी दुपारी साडेबाराच्या सुमारास हा अपघात झाला. याप्रकरणी पोलिसांनी तपास करून एक महिन्यानंतर अज्ञात चालकाविरोधात गुन्हा दाखल केला आहे. महादेव बबन कान्हूरकर (वय ४२) असे अपघातात मृत्यू झालेल्याचे नाव आहे. याप्रकरणी त्यांच्या पत्नीने भोसरी एमआयडीसी पोलीस ठाण्यात बुधवारी (दि. १५) फिर्याद दिली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी यांचे पती महादेव कान्हूरकर हे त्यांच्या दुचाकीवरून १६ फेब्रुवारीला दुपारी साडेबाराच्या सुमारास स्पाईन रस्त्यावरून खडी मशीनकडे जात होते. त्यावेळी नाशिक-पुणे महामार्गावर जयगणेश साम्राज्य चौक येथे भोसरीकडून येणाऱ्या एका अनोळखी चालकाच्या दुचाकीने महादेव यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. यात महादेव यांना गंभीर दुखापत होऊन त्यांचा मृत्यू झाला. अपघातानंतर अनोळखी दुचाकीचालक घटनास्थळी न थांबता भरधाव निघून गेला. महादेव यांचा दुचाकीवरून पडून मृत्यू झाला असावा, असा अंदाज व्यक्त करण्यात आला होता. त्यानुसार याप्रकरणी सुरवातीला अपघाती मृत्यूची नोंद करण्यात आली होती. दरम्यान, पोलिसांनी तपास केला असता, एका अनोळखी चालकाच्या दुचाकीने महादेव यांच्या दुचाकीला धडक दिल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार अनोळखी दुचाकी चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. भोसरी पोलिस तपास करत आहेत.

### सोमाटने फाट्यावर अपघात

**पिंपरी :** पुणे-मुंबई महामार्गावर आणखी एक भीषण अपघात झाला आहे. डिव्हाईडरचा आख्खा रॉड कारच्यामधून आर-पार गेला. सुदैवाने तिघांच्या मधून डिव्हायडरचा रॉड आरपार गेला. या अपघातात एका प्रवाशाला गंभीर इजा झाली आहे. त्याला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. हा अपघात शनिवारी १८ मार्च साडे सातच्या सुमारास सोमाटणे फाट्यावर झाला. मुंबईवरुन सोमाटण्याकडे वळताना चालकाचा गाडीवरील ताबा सुटला अन् गाडी थेट अशा पद्धतीने डिव्हाईडरमध्ये घुसली. या कारमधून चालक आणि दोन प्रवासी महिला असे एकूण तीन जण प्रवास करत होते. सुदैवाने अपघातात कोणतीही जीवितहानी झाली नाही. दरम्यान, शुक्रवारी याच परिसरात कारने ट्रकला मागून धडक दिली होती. अर्धी कार ट्रकखाली अडकल्याने तीन प्रवाशांचा जागीच मृत्यू झाला होता. ही कार मुंबईहून पुण्याकडे जात होती. उर्से टोलनाक्याजवळ कारने ट्रकला मागून जोरदार धडक दिली. अपघात एवढा भीषण होता की अर्धी कार ट्रकखाली गेली. यामुळे कारमधील तिघांचा जागीच मृत्यू झाला. त्यानंतर महामार्ग पोलिसांनी यंत्रणांच्या मदतीने यातील वाहने बाजूला करुन वाहतूक सुरळीत केली.

# पिंपरी चिंचवडमधील अनेक दिग्गज शिवसेनेत येण्यास इच्छुक

**-आढळराव पाटील**



**पिंपरी :** सुशिक्षित युवक राजकारणात येत आहे हि देशाच्या दृष्टीने चांगली गोष्ट आहे.शहरातील अनेक दिग्गज शिवसेनेत येण्यास इच्छुक आहेत असे प्रतिपादन शिवसेना उपनेते व माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील, यांनी येथे केले. भोसरी विधानसभा मतदार संघात अनेक कार्यकर्त्यांनी शिवसेनेत जाहीर प्रवेश केला यावेळी आढळराव पाटील बोलत होते त्यांच्या हस्ते पदाधिकाऱ्याना नियुक्ती पत्र देण्यात आले.

शिवसेना उपनेते इरफान भाई सय्यद, शिवसेना जिल्हाप्रमुख व पुणे जिल्हा नियोजन समिती सदस्य भगवान पोखरकर, उपजिल्हाप्रमुख संभाजीराव शिरसाट , चाकण शहर प्रमुख अक्षय जाधव ,युवा जिल्हाधिकारी धनंजय पठारे, विधानसभा प्रमुख दत्तात्रय भालेराव,भोसरी महिला शहरप्रमुख मनीषा परांडे, महिला शहर संघटिका जान्हवी पवार उपशहर प्रमुख रामदास गाढवे, विशाल लांडगे किशोर सवाई उपस्थित होते.यावेळी आढळराव पाटील म्हणाले की, ८० टक्के समाजकारण आणि २०टक्के राजकारण या बाळासाहेबांच्या विचारावर शिवसेना पक्ष उभा राहिला, याच विचारांच्या बांधिलकीवर मी बाळासाहेबांच्या शिवसेनेचा शिवसैनिक झालो, भाजप बरोबर युती असल्याने कायम हिंदुत्व आणि विकासाच्या मुद्यावर लढणारी शिवसेना सत्तेच्या आणि मुख्यमंत्री पदाच्या लालसे पोटी विरोधी पक्षा बरोबर गेली हा घरोबा शिवसेनेतील अनेक पदाधिकाऱ्याना हा निर्णय पटला नाही, सगळ्यांच्याच मनात नाराजी होती, राज्याचे मुख्यमंत्री शिवसेना पक्षाचे असून सुद्धा विकास निधी मिळत नव्हता, अनेक प्रलंबित कामे होत नव्हती, अनेक कार्यकर्त्यांवर खोटे गुन्हे दाखल होत होते, उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असून सुद्धा दखल घेतली जात नव्हती. त्यामुळे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतलेल्या निर्णयाला सगळ्यात अगोदर पाठिंबा देणाऱ्यांमध्ये सर्वात अगोदर नाव माझे होते, आज राज्यात भाजपा बरोबर युतीचे सरकार आहे, विकास कामासाठी निधी मिळत आहे, रखडलेली अनेक कामे मार्गी लागली आहेत, .

प्रास्ताविक प्रा दत्तात्रय भालेराव यांनी केले तर सागर पचारणे यांनी आभार मानले.

### लोणावळा शहरातील दिव्यांगांना मिळणार

## वार्षिक ३० हजार रुपये उदरनिर्वाह भत्ता

**लोणावळा (वार्ताहर) :** लोणावळा नगरपरिषद हद्दीमधील पात्र दिव्यांग व्यक्तींच्या उदरनिर्वाह भत्त्यामध्ये लोणावळा नगरपरिषदेकडून वाढ करण्यात आली आहे. यामुळे यापूर्वी मिळणारा १८००० रुपये वार्षिक उदरनिर्वाह भत्ता इथून पुढे ३० हजार रुपये असा मिळणार आहे. १५०० रुपये वरून आता हा भत्ता मासिक २५०० रुपये करण्यात आला असल्याची माहिती मुख्याधिकारी तथा प्रशासक पंडित पाटील यांनी दिली.

लोणावळा नगर परिषदेच्या माजी नगराध्यक्ष सुरेखाताई जाधव व माजी उपनगराध्यक्ष श्रीधर पुजारी यांनी २० डिसेंबर २०२२ रोजी लोणावळा नगरपरिषदेचे प्रशासक तथा मुख्याधिकारी यांना लेखी पत्र देत वाढत्या महागाईचा विचार करिता दिव्यांग बांधवांच्या उदरनिर्वाह भत्त्यामध्ये वाढ करत तो ३६ हजार रुपये करण्यात यावा अशी मागणी केली होती. या मागणीला यश आले असून मुख्याधिकारी पंडित पाटील यांनी मागणीचा सकारात्मक विचार करत तात्काळ २०२२ - २३ च्या आर्थिक वर्षात अंध अपंग समस्या योजना ५ टक्के राखीव निधीमधून दिव्यांग उदरनिर्वाह भत्त्यात वाढ केली आहे. याचा लाभ लोणावळा शहरातील जवळपास दोनशेच्या आसपास पात्र लाभार्थ्यांना मिळणार आहे.

## माझी वसुंधरा अभियानांतर्गत मियावाकी पद्धतीने श्रमदानातून वृक्षलागवड



**तळेगाव दाभाडे (वार्ताहर):** सुट्टीच्या दिवशी तळेगाव दाभाडे नगर परिषदेकडून माझी वसुंधरा अभियानांतर्गत मियावाकी पद्धतिने मुख्याधिकारी विजय सरनाईक यांच्या मार्गदर्शनाखाली श्रमदानातून वृक्षलागवड करण्यात आली.

माझी वसुंधरा अभियातील भूमी या घटकाच्या माध्यमातून तळेगाव दाभाडे शहरात स्टेशन तळे परिसरात पुणे-मुंबई हायवेलगत मियावाकी पद्धतिने श्रमदानातून वृक्ष लागवड उपक्रम राबविण्यात आला. हा वृक्ष लागवड कार्यक्रम तळेगाव दाभाडे नगरपरिषदेच्या सर्व अधिकारी, कर्मचारी यांच्या श्रमदानातून पार पडला. या उपक्रमाअंतर्गत वड, पिंपळ, ताम्हण, सोनचाफा, बकुळ, स्पॅथोडिया या प्रजातींच्या ५३० वृक्षांची लागवड करण्यात आली. उन्हाळ्याच्या दिवसात वृक्षांचे जतन योग्य पद्धतीने व्हावे यासाठी प्रथम ठिबक सिंचनचे काम या वृक्षलागवड ठिकाणी करण्यात आले आहे.

वृक्ष लागवड उपक्रमा दरम्यान शहरातील पर्यावरणासाठी सातत्याने काम करत असलेल्या नागरिकांच्या कार्याची दखल घेत नगर परिषदेमार्फत महेश महाजन, ओगले, अभय केवट, ऋषिकेश कुलकर्णी, मयुरेश राजगुरव यांना मानपत्र देऊन पर्यावरण दूत म्हणून नियुक्ती करणेत आली. या वृक्ष लागवड उपक्रमाचे नियोजन मुख्याधिकारी विजयकुमार सरनाईक व उपमुख्याधिकारी सुप्रिया शिंदे ,उद्यान निरीक्षक सिद्धेश्वर महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली करणेत आले होते.

यावेळी तळेगाव नगरपरिषदेचे सर्व संवर्ग अधिकारी, नगरपरिषद कर्मचारी तसेच वृक्ष प्राधिकरण समिती सदस्य, वन्यजिव रक्षक संस्थेचे संस्थापक निलेश गराडे, सदस्य रौनक खरे उपस्थित होते.

## दिव्यांगांनी एक एप्रिलपासून यूडीआयडी कार्ड बाळगणे सक्तीचे

**पिंपरी :** केंद्र सरकारच्या दिव्यांगजन सक्षमीकरण विभागाच्या कल्याणकारी योजनांचा लाभ घेण्यासाठी देशभरातील दिव्यांगांना येत्या एक एप्रिलपासून 'युनिक डिसेबिलिटी आयडेंटिफिकेशन कार्ड' (यूडीआयडी) बाळगणे बंधनकारक करण्यात आले आहे.(UDID) त्या धर्तीवर राज्य सरकारकडूनही दिव्यांगांना 'यूडीआयडी कार्ड' अनिवार्य करण्यात येणार असून, दिव्यांगांना जवळच्या रुग्णालयातून हे कार्ड देण्यासाठी विशेष प्रयत्न सुरू करण्यात आले आहेत.

केंद्र सरकारच्या सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालयांतर्गत दिव्यांगजन सक्षमीकरण विभागासह भारतीय कृत्रिम अंग निर्माण महामंडळ,

- वैयक्तिक तपशील भरावेत. आधार क्रमांकाचाही उल्लेख करावा.
- दिव्यांगत्वाचा प्रकार निवडावा. बहुदिव्यांगत्व असल्यास नमूद करावे.
- आपल्या पत्त्याच्या जवळचे एक रुग्णालय निवडावे.
- दिव्यांगत्वाच्या प्रकारानुसार रुग्णाला तज्ज्ञ डॉक्टरांकडे पाठविले जाते.
- तज्ज्ञ डॉक्टरांकडून रुग्णाची वैद्यकीय तपासणी केली जाते.
- त्यानंतर दिव्यांगांना 'यूडीआयडी' कार्ड, प्रमाणपत्र दिले जाते.

राष्ट्रीय दिव्यांग आर्थिक विकास महामंडळ, भारतीय पुनर्वसन परिषद आदी संबंधित संस्थांतर्फे दिव्यांगांसाठी विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येतात. या योजनांचा लाभ घेण्यासाठी केंद्र सरकारने दिव्यांगांना 'यूडीआयडी' कार्ड अनिवार्य केले आहे.

'यूडीआयडी' कार्डामुळे चाळीस टक्के किंवा त्यापेक्षा अधिक दिव्यांगत्व असलेल्या व्यक्ती या सरकार स्तरावर अधिसूचित होणार असून, केंद्र आणि राज्य सरकारतर्फे दिव्यांगांसाठी राबविण्यात येणाऱ्या सर्व कल्याणकारी योजनांचा लाभ घेण्यास पात्र ठरणार आहेत. त्यामुळे सर्व दिव्यांग व्यक्तींनी 'यूडीआयडी' (UDID) संकेतस्थळावर नोंदणी करून आपले कार्ड काढून घ्यावे,' असे आवाहन दिव्यांग कल्याण आयुक्तालयाचे उप आयुक्त संजय कदम यांनी केले आहे. केंद्र सरकारच्या www.swavlambancard.gov.in या संकेतस्थळावर जाऊन अर्ज करता येणार आहे.

## प्रीमियर लीग स्पर्धेस सुरुवात



**पिंपरी :** सम्राट मित्र मंडळ, थेरगाव आयोजित थेरगाव प्रिमिअर लीग पर्व १ ले या स्पर्धेची सुरुवात काल वेंगसरकर क्रिकेट अॅकॅडमी एक गाव, १६ संघ या संकल्पनेतुन करण्यात आली.

या स्पर्धेचे उद्घाटन पीएमआरडीए आयुक्त राहुल महिवाल यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी सर्व १६ संघ व सम्राट मित्र मंडळाचे सभासद,युवा सेनेचे विश्वजित बारणे आदी उपस्थित होते.

## आयत्या बिळावर नागोबा राष्ट्रवादीचा भाजपवर हल्लाबोल

**पिंपरी :** शहरात राष्ट्रवादी काँग्रेसने पूर्वी केलेल्या विकास प्रकल्पांचीच उदघाटन आता भाजपचे नेते करतात आणि स्वतःच्या नावाची टीमकी वाजवतात, अशी टीका राष्ट्रवादी कडून केली जाते. मासुळकर कॉलनीमध्ये चार वर्षांपूर्वी उभारण्यात आलेल्या नेत्र रुग्णालयाचे उद्घाटन उद्या सकाळी अकरा वाजता पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते होणार असल्याने त्याचाही खरपूस समाचार राष्ट्रवादीने घेतला आहे.ऋआयत्या बिळावर नागोबा, पहायला उद्या सकाळी ११ वाजता यात्रऋ, अशा आशयाचे चित्र काढून ते सोशल मीडियावर व्हायरल केले




आहे. मासुळकर कॉलनी मधील नेत्र रुग्णालयाचे भूमिपुजन २०१६ मध्ये तत्कालिन पालकमंत्री अजित पवार यांच्या हस्ते करण्यात आले.

२०१७ मध्ये राष्ट्रवादीचे पॅनल या प्रभागातून विजयी झाले. १०० खाटांच्या सुमारे २५ कोटी रुपये खर्चाचे रुग्णालय लवकर पूर्ण करण्यासाठी प्रयत्न केले. चार वर्षांपूर्वीच ते बांधून पूर्ण झाले, पण उद्घाटनाअभावी खुले नव्हते. २०१९-२० मध्ये कोरोना काळात त्याचा वापर सुरू केला. कोरोना काळात सलग दोन वर्षे लसिकरणाची मोठी मोहिम याच रुग्णालयात सुरू होती. नंतरच्या काळात त्याचा वापर बंद करण्यात आला. आता पुन्हा स्वतंत्र नेत्र रुग्णालय म्हणून ते लोकांसाठी खुले होणार असून त्याचे लोकार्पण पालकमंत्री पाटील यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. तोच धागा पकडून श्रेय लाटणाऱ्या भाजपवर राष्ट्रवादीने कुरघोडी केली आहे ऋआयत्या बिळावर नागोबाऋ चे सोशल मीडिया कॅम्पेन राबविल्याने तो चर्चेचा विषय झाला आहे.

## भविष्य निर्वाह निधी कार्यालयातर्फे २७ मार्च रोजी निधी आपके निकट

**पिंपरी :** कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटना प्रादेशिक कार्यालय पुणे कार्यालयातर्फे निधी आपके निकट कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे सोमवार दिनांक २७ मार्च रोजी सकाळी ९ ते दुपारी ४ वाजेपर्यंत पिंपरी चिंचवड, साइन्स पार्क रोड, डी मार्ट च्या मागे, ऑटो क्लस्टर एक्झिबिशन सेंटर जवळ, चिंचवड, येथे हा कार्यक्रम होणार आहे.

यामध्ये सर्व आस्थापनांचे मालक व कर्मचारी अधिकाधिक संख्येने सहभागी होवून भविष्य निर्वाह निधी संदर्भात त्यांच्या समस्या, शंका आणि इतर माहितीबाबत फायदा घेवु शकतात. या कार्यक्रमात सर्व कंपनी मालक आणि कर्मचा-यांना भविष्य निर्वाह निधी कायदयातील कर्तव्ये आणि जबाबदा-यांबद्दल सांगितले जाईल. तसेच त्यांच्या समस्या, शंका आणि अडचणी सोडवल्या जातील. या कार्यक्रमाचे देशभरातील ५०० जिल्ह्यांमध्ये आयोजन करण्यात आले आहे. अशी माहिती भविष्य निर्वाह निधी कार्यालयातर्फे देण्यात आली आहे.

## चेंबर मोडकळीस...

अर्बन स्ट्रीट अंतर्गत बनविण्यात आलेल्या रस्त्यांवरील गटारांचे चेंबर मोडकळीस आलेले आहेत. वाहन चालक तसेच पादचारी नागरीकांच्या दृष्टीने धोकादायक ठरत आहेत. (छायाचित्र : अरुण गायकवाड)






# ऊसतोड थांबल्याने कामगारांना सक्तीची विश्रांती

**तळेगाव दाभाडे (वार्ताहर) :** अवकाळी पावसामुळे मावळ व मुळशी तालुक्याच्या पश्चिमपट्यातील श्री संत तुकाराम सहकारी साखर कारखान्याची ऊसतोड थांबल्याने ऊसतोड कामगारांना सक्तीने विश्रांती घ्यावी लागत असल्याने कामगारांमध्ये नाराजी पसरली आहे.

श्री संत तुकाराम सहकारी साखर कारखान्याचा सध्या २५ वा गाळप हंगाम चालू आहे. या काळाच्या अखेरच्या टप्प्यातील ऊस तोडणी चालू असतानाच अवकाळी पावसाने मावळ आणी मुळाशी तालुक्यातील पश्चिम पट्ट्यात जोरदार हजेरी लावली आहे. या पावसाने काही उसाच्या शेतात पाणी साठल्याने ऊसतोड बंद पडली आहे. तर ऊस तोडणी नंतरची ऊस वाहतुकही पूर्णपणे बंद पडली आहे.

श्री संत तुकाराम सहकारी साखर कारखान्याचे रोजच्या गाळपासाठी साधारणपणे ३हजार ५००मॅट्रीक टन ऊसाची गरज लागते. कारखान्याने ऊसतोडीचे नियोजन मावळ, मुळशी, खेड, हवेली तसेच शिरुर या तालुक्यातमध्ये केलेले असुन या सर्वच तालुक्यातमध्ये कमी अधिक प्रमाणात अवकाळी पाऊस कोसळत आहे .यामुळे ऊस उत्पादक शेतकरी अडचणीत आणी नुकसानीत आला आहे.

> या हंगामाचा सध्या १४४वा गाळप दिवस चालू असुन आतापर्यंत४ लाख ६५ हजार मेट्रिक टन ऊस गाळप झालेले आहे. तर ५ लाख २६ लाख ६०० टन साखरीप उत्पादन झाले आहे.तर सलग २५वर्षे कारखाना सलगपणे गाळप करीत आहे.

कारखान्याचे संस्थापक अध्यक्ष नानासाहेब नवले व उपाध्यक्ष बापुसाहेब भेगडे यांचे मार्गदर्शनाखाली कारखान्याचे रौप्य महोत्सवी गाळप हंगाम चालू असताना अवकाळी पावसाने जोरदार तडाखा दिल्याने शेतकरी चिताग्रत झाले आहेत.

यावर्षी अतिवृष्टी तसेच अवकाळी पावसामुळे ऊसशेतीचे मोठे नुकसान होऊनही शेतकरी आणी कारखान्याचे प्रशासन सर्व विभाग प्रमुख यांचे विशेष प्रयत्नांमुळे हा गाळप हंगाम चालू ठेवला असून कारखान्याचा गाळप हंगाम यशस्वी होत असल्याचे कार्यकारी संचालक साहेबराव पाठारे यांनी सांगितले.

# वायसीएममधील शवविच्छेदन गृहाचा होणार विस्तार

## एकाच वेळी नऊ मृतदेहांचे शवविच्छेदन शक्य

**पिंपरी :** पिंपरी – चिंचवड महापालिकेच्या वायसीएम रुग्णालयात केवळ पिंपरी – चिंचवड शहरातील नव्हे तर चाकण, मावळ परिसरातूनही मृतदेह शवविच्छेदनासाठी येत असतात. त्यामुळे मरणानंतरही शवविच्छेदन अहवालासाठी नातेवाईकांना 'वेटींग' करावे लागत होते. त्याचा मनस्ताप नातेवाईक तसेच पोलिसांनाही होत होता. यावर उपाय म्हणून वायसीएम रुग्णालयातील शवविच्छेदन विभागाचा विस्तार होत असून नवीन शवविच्छेदन विभागात एका वेळी नऊ मृतदेहांचे शवविच्छेदन शक्य होणार आहे. मे २०२३ पासून नवीन इमारत कार्यरत होणार आहे. केवळ शवविच्छेदनच नाही तर या बरोबरच कोल्ड स्टोरेज आणि वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांसाठी गॅलरी, ग्रंथालय, सेमिनार हॉल, संग्रहालय अशा विविध सुविधा देखील नव्या इमारतीत असणार आहेत.

> **उत्पन्न मिळणार**
> १) कोल्ड स्टोरेज : १२० रुपये प्रति दिवस
> २) मेडिकल कॉलेज : १ लाख २५ हजार डिपॉझिट आणि २० ते ४० हजार रुपये वार्षिक फी
> ३) हॉल, लर्निंग सेंटर भाडेतत्वावर दिले जाणार आहेत.

शवविच्छेदन गृहात न्यायवैद्यक शास्त्राचे प्राध्यापक, सहायक प्राध्यापक आणि इतर स्टाफ देण्याची प्रकिया सुरु आहे. त्यांच्यासाठी नव्या इमारतीमध्ये स्वतंत्र दालने असणार आहेत. न्यायवैद्यक शास्त्रातील तज्ज्ञ देखील नेमले जाणार आहेत. कोल्ड स्टोरेज ची क्षमता २० पेट्यांतून वाढवून ती ६० पेट्या एवढी केली जाणार आहे.

नव्या इमारतीत सहा डॉक्टर आणि १६ कर्मचारी असावेत.तसेच सध्या एक फॉरेन्सिक एक्सपर्ट असून चार फॉरेन्सिक एक्सपर्ट असावेत, अशी मागणी केली आहे. फोटोग्राफी, शस्त्र, विषबाधा या संबंधित सखोल माहिती असणारे संग्रहालय असेल. हे संग्रहालय सर्वसामान्य नागरिकांसाठी देखील खुले राहील. ६० विद्यार्थी क्षमतेचा सेमिनार हॉल असेल.तिथे वैद्यकीय महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे सेमिनार होऊ शकेल. सर्व अत्याधुनिक सुविधांनी सुसज्ज असले मिनी ऑपरेशन थिएटर असेल.

या अॅडव्हान्स लर्निंग सेंटर मध्ये विद्यार्थी इन कॅमेरा आपल्या विषयाशी संबंधित शस्त्रक्रिया करू शकतील.नव्या इमारतीत कामकाज सुरु झाल्यानंतर जुन्या इमारतीमध्ये डी कंपोज बॉडी रूम बनविली जाणार आहे.रुग्णवाहिका आणि नातेवाईकांच्या वाहनांसाठी नव्या इमारतीत पार्किंगची सोय असेल.

आर्थिक दुर्बल रुग्णांना

# मार्गदर्शन व मदत हा 'आरोग्य मित्र'चा प्रमुख उद्देश

**लोणावळा (वार्ताहर):** आर्थिक कुवत नसलेल्या आणि शासकीय योजनांबाबत अनभिज्ञ असलेल्या रुग्णांना वैद्यकीय उप–चारांसाठी योग्य मार्गदर्शन आणि मदत पुरवणं हा 'आरोग्य मित्र'चा प्रमुख उद्देश असल्याचे प्रतिपादन आरोग्य मित्र मेडिकल फाऊंडेशनचे अध्यक्ष, माजी उपनगराध्यक्ष श्रीधर पुजारी यांनी केले. आरोग्य मित्र मेडिकल फाऊंडेशन या सेवाभावी संस्थेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.

सुमित्रा हॉल याठिकाणी आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात आरोग्य मित्र मेडिकल फाऊंडेशनच्या स्थापनेची घोषणा करण्यात आली. लोणावळ्याच्या माजी नगराध्यक्ष आणि फाऊंडेशनच्या सदस्य सुरेखा जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष श्रीधर पुजारी यांनी संस्था स्थापनेमागची उद्दिष्ट आणि उद्देश सांगितले. यावेळी दिलीप आंबेकर, अभिजित गायकवाड, विशाल पाडाळे, राजु खंडेलवाल, विकी पारलेचा, अनिल गायकवाड, हर्षल होगले, आशिष बुटाला, ऋषिकेश लेडंघर, उमेश खंडेलवाल, शिंदे, शौकत शेख आदींसह मान्यवर उपस्थित होते.

संस्थेविषयी बोलताना पुजारी म्हणाले, लोणावळा शहर आणि परिसरातील आर्थिक आणि शैक्षणिक दृष्ट्या मागासलेल्या गोर–गरीब तसेच आदिवासी नागरिकांना योग्य असे वैद्यकीय मार्गदर्शन मिळावे, अत्यल्प दरातील उत्कृष्ट वैद्यकीय उपचार वेळेत मिळावे, वैद्यकीय मदतीसाठी उपलब्ध असलेल्या विविध सरकारी योजनांचा लाभ त्यांना त्यांना घेता यावा यासाठी 'आरोग्य मित्र' सातत्याने प्रयत्नशील राहणार असून त्यासाठी लोणावळा शहरात संस्थेचे संपर्क कार्यालय सुरू करण्यात येणार आहे. रुग्णसेवेचा वसा घेऊन कार्य करीत असताना नागरिकांसाठी वेळोवेळी मोफत वैद्यकीय आणि मार्गदर्शन शिबिर, रक्तदान शिबिर यांचे आयोजन करणं, रुग्णवाहिका सेवा पुरवणं, अत्यल्प दरात विविध वैद्यकीय चाचण्या उपलब्ध करून देणे, योग तसेच गर्भसंस्कार शिबिरांचे आयोजन करणे, स्वस्त दरात औषधे उपलब्ध करून देणे ही काम 'आरोग्य मित्र' द्वारे करण्यात येणार असल्याचे पुजारी यांनी सांगितले.

# चिखली येथे तरुणाची नैराश्यातून आत्महत्या

**पिंपरी :** नैराश्यातून एका तरुणाने अकराव्या मजल्यावरून उडी मारून आत्महत्या केली आहे.ही घटना आज (शनिवारी) सकाळी साडे आठच्या सुमारास चीखलीतील रिव्हर रेसिडेन्सी येथे घडली आहे. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे. विरेन जाधव (वय २७ रा चिखली मूळ नाशिक) असे मयत तरुणाचे नाव आहे.पोलिसांनी दिलेल्या माहिती नुसार, वीरेन हा एका नामांकित कंपनीत जॉब वर होता. तो एकटाच मामाच्या फ्लॅटमध्ये राहत होता.त्याने बिल्डिंगच्या पोर्च मध्ये येत थेट अकराव्या मजल्यावरुन उडी घेत आत्महत्या केली. हि आत्महत्या नैराश्यातून केली असल्याचे पोलिसांनी सांगितले.चिखली पोलीस पुढील तपास करत आहेत. विरेन जाधव याने आत्महत्या करण्यापूर्वी आपल्या नोटबुकमध्ये आपण आत्महत्या का करत आहे, याबद्दल लिहून ठेवलं आहे. 'मला चांगल्या कंपनीमध्ये चांगल्या पगाराची नोकरी आहे,तरी मला आनंद मिळत नाही' असं लिहून जाधव याने आपण आत्महत्या करत असल्याचे सांगितलं आहे.

# सिद्धबेटाचे पावित्र्य जोपासण्यासाठी सहकार्य करावे

## मुख्याधिकारी कैलास केंद्रे

**आळंदी (वार्ताहर) :** येथील पवित्र सिध्दबेटाचे स्थान माहात्म्य, पुरातन वैभव लक्षात घेऊन सिद्धबेटाचे पावित्र्य जोपासण्यास सर्वांनी सहकार्य करावे असे आवाहन आळंदी नगरपरिषद मुख्याधिकारी कैलास केंद्रे यांनी केले.

येथील सिद्धबेट ग्राम विकास प्रतिष्ठानचे माध्यमातून विंधन विहिरीवर विद्युत मोटार पंप बसवून वृक्षांना पाणी देण्यासाठीची यंत्रणा विकसित करण्यात आली. या विकसित पाण्याचे यंत्रणेचे लोकार्पण मुख्याधिकारी कैलास केंद्रे यांचे हस्ते करण्यात आले. याप्रसंगी ते मार्गदर्शन करताना बोलत होते. या प्रसंगी माऊलीदास महाराज, संयोजक आळंदी जनहित फाउंडेशन कार्याध्यक्ष अर्जुन मेदनकर, भागवत काटकर, किरण नरके, ज्ञानेश्वर उर्फ बापू कुऱ्हाडे, मयूर पेटकर, सहदेव गोरे आदी सेवाभावी संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

यावेळी सिद्धबेट विकासाचे कार्यास गती दिल्या बद्दल मुख्याधिकारी कैलास केंद्रे यांचा सत्कार माऊलीदास महाराज यांचे हस्ते करण्यात



आला. तसेच सिद्धबेट ग्राम विकास प्रतिष्ठानचे अध्यक्ष, केळगाव ग्रामपंचायत माजी सरपंच विकास शेठ मुंगसे यांचे कार्याचा गौरव म्हंणून विविध सेवाभावी संस्थाच्या तर्फे सत्काराचे नियोजन उत्साहात करण्यात आले.

यावेळी मुख्याधिकारी कैलास केंद्रे म्हणाले, आळंदी शहरामध्ये सिद्धबेटाचे महत्त्व स्थानिक नागरिकांना माहिती आहे. परंतु जे नागरिक भाविक म्हणून बाहेरून येतात त्यांना या जागेचे तितकेसे महत्त्व माहिती नाही. आपली सर्वांची नैतिक जबाबदारी आहे कि, माऊलींचे आई वडील आपल्या आयुष्याच्या शेवटच्या काळात वास्तव्यास होते. अशा पवित्र भूमीची माहिती सर्वां पर्यंत पोहोचली पाहिजे. या ठिकाणी येणाऱ्या सर्वांना येथील आल्हाददायक वातावरण व्यवस्थित रित्या त्याचे महत्व या ठिकाणी पाहता यावे. यासाठी सर्वांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे. नगरपरिषद प्रशासना मार्फत सर्व नागरिक आणि विविध सेवाभावी संस्थानच्या मदतीने या ठिकाणी हळू हळू एक एक कार्यक्रम राबवित, उपक्रम हाती घेत प्रामाणिकपणे जी या ठिकाणची वस्तुस्थिती आहे ती बदलण्याचा प्रयत्न सुरु आहे. यासाठी स्थानिकांचे मदतीचे हात समोर येत आहेत. प्रशासन मार्फत जे बदल करण्याचे आहेत जसे गार्ड नियुक्ती आणि इतर सर्व हे आपल्यावर थोपवले गेली आहे.

हे न समजता आपण ते चांगला बदल करण्यासाठी आपण ते करत आहोत याचा स्वीकार केला जावा असे त्यांनी सांगितले. या बदलात सुसूत्रता असावी यासाठी ज्या पद्धतीने शक्य आहे, ती मदत करताना प्रशासनास पूर्व कल्पना देण्याचे आवाहन त्यांनी केले. संयोजन आळंदी जनहित फाउंडेशन कार्याध्यक्ष अर्जुन मेदनकर यांनी केले. सूत्रसंचालन भागवत काटकर यांनी केले. आभार माऊलींदास महाराज यांनी मानले.

# पालिकेच्या विविध प्रकल्पांचे आज उद्घाटन

**पिंपरी :** राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण, वस्त्रोद्योग, संसदीय कार्य मंत्री तथा पालकमंत्री, पुणे चंद्रकांत (दादा) पाटील यांच्या हस्ते उद्या रविवार दिनांक १९ मार्च रोजी होणार आहे. शंकरराव मासुळकर अर्बन हेल्थ सेंटर व आय हॉस्पिटलचे उदघाटन प्रभाग क्र. ९ (जुना प्रभाग क्र. २८) मासुळकर कॉलनी, पिंपरी (आरक्षण क्र. ८५) नागरी आरोग्य केंद्र व नेत्र रुग्णालय या ठिकाणी सकाळी १० वाजता होणार आहे. त्यानंतर १०.३० वाजता भोसरी गवळीमाथा येथील कचरा हस्तांतरण केद्राचे उद्घाटन तर सकाळी १०.५० वाजता कासारवाडी येथील कचरा हस्तांतरण केद्राचे उद्घाटन होणार असून आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या अध्यक्षतेखाली होणा–या या कार्यक्रमास खासदार,आमदार आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. शंकरराव मासुळकर आय हॉस्पिटल हे पदव्युत्तर संस्था, वायसीएम रुग्णालयाशी संलग्नित राहणार असल्यामुळे एम एस– ऑपथालमोलॉजी पदव्युत्तर विद्यार्थ्यांना प्रशिक्षण केंद्र म्हणून देखील उपलब्ध होणार आहे. या व्यतिरिक्त महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, मुख्यमंत्री महा–आरोग्य कौशल्य विकास कार्यक्रम, कौशल्य प्रयोगशाळा, संशोधन केंद्र इ. करिता या रुग्णालयाचा वापर होणार आहे.

# डॉ. देवेंद्र शिरोडे यांचा तरुण शास्त्रज्ञ पुरस्काराने सन्मान

**पिंपरी:** प्राध्यापक डॉ. देवेंद्र शिरोडे यांना सोसायटी फॉर सायन्स अँड एन्व्हायरमेंटच्या वतीने तरुण शास्त्रज्ञ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

त्यांना हा पुरस्कार जळगाव येथे आयोजित पर्यावरण, फार्माकोलॉजी आणि जीवशास्त्रा–वरील राष्ट्रीय परिषद मध्ये लॉर्ड्स युनिव्हर्सिटीचे कुलगुरू डॉ. सुरेश जोशी आणि फार्माकोलॉजी जर्नलचे संपादक डॉ. राम प्रकाश यांच्या



हस्ते स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले.

डीवायपाटील फार्मसी कॉलेजमध्ये प्राध्यापक म्हणून कार्यरत आहे.येथे त्यांना १५ वर्षांचा अध्यापनाचा तसेच संशोधनाचा अनुभव असून वेगवेगळे कन्सल्टन्सी प्रोजेक्ट त्यांनी पूर्ण केले आहे.

आतापर्यंत त्यांनी १ पेटंट आणि ४१ राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय शोधनिबंध प्रकाशित झाले असून, ४ पुस्तकांचे लिखाण त्यांनी केले आहे तसेच २७ बी.फार्मसी आणि एम.फार्मसी विद्यार्थ्यांना प्रोजेक्ट साठी मार्गदर्शन केले आहे. सावित्रीबाई फुले विद्यापीठ प्रायोजित नवीन राष्ट्रीय धोरण २०२० या विषयावरील प्रायोजित कार्यशाळेसाठी त्यांना अनुदान मिळाले होते.

# पालिका शाळांतील एक हजार विद्यार्थ्यांना नेत्रदोष

## सीएसआर फंडातून चष्मे वाटप करणार

**पिंपरी:** पिंपरी – चिंचवड महापालिकेच्या प्राथमिक आणि माध्यमिक शाळेतील सर्वच विद्यार्थ्यांच्या नेत्र तपासणीमध्ये एक हजार विद्यार्थ्यांमध्ये नेत्रदोष असल्याने या विद्यार्थ्यांना पुढील काळात चष्म्यांचे वाटप करण्यात येणार आहे, अशी माहिती शिक्षण विभागाचे उपायुक्त संदीप खोत यांनी दिली.

ऑक्टोबर २०२२ पासून तपासणी मोहीम हाती घेण्यात आली होती.शहरातील प्राथमिक आणि माध्यमिक विभागाच्या प्रत्येक शाळेत जाऊन विद्यार्थ्यांच्या डोळयांची तप–ासणी करण्यात आली.त्यामध्ये सुमारे एक हजार विद्यार्थ्यांमध्ये नेत्रदोष आढळल्याने त्यांना सीएसआर फंडातून चष्मे वाटप करण्यात येणार आहेत.

महापालिकेच्या शहरात १०५ प्राथमिक आणि १८ माध्यमिक शाळा आहेत.त्यामध्ये दोन्ही विभागात



सुमारे ४५ हजार विद्यार्थी शिक्षण घेतात.त्यापैकी नेत्रदोष असणार्या विद्यार्थ्यांच्या डोळयांची तपासणी करण्यात आली.

ज्यांना डोळयांचा आजार नाही, अशाही विद्यार्थ्यांची तपासणी करण्यात आली.प्राथमिक आणि माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या डोळयांची तप–ासणी आणि चष्मे वाटप करण्यासाठी सुमारे १५ लाख रुपयांचा खर्च आहे.हा खर्च सीएसआर फंडातून केला जाणार आहे.त्यासाठी सीएसआर फंड उपलब्ध करुन देणार्या कंपन्यांकडे संपर्क साधण्याचे काम सध्या सुरु आहे.काही कंपन्यांकडे या कामी शिक्षण विभागाकडून प्रस्ताव पाठविण्यात आले आहेत.

त्या कंपन्यांकडून सकारात्मक प्रतिसाद येताच चष्मे वाटप प्रक्रिया पार पाडली जाणार आहे, असे उपायुक्त खोत यांनी सांगितले.

# शहरात पंतप्रधान आवासची अंमलबजावणी पारदर्शकपणे करा

## अण्णा बनसोडे

**पिंपरी :** शहरात पंतप्रधान आवास योजनेची अंमलबजाणवी सक्षम व पारदर्शीपणे करा, अशी मागणी राष्ट्रवादीचे आमदार अण्णा बनसोडे यांनी केली आहे.

याबाबत महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांना पत्र देण्यात आले आहे. त्यामध्ये म्हटले आहे की, पिंपरी–चिंचवड महापालिका आणि केंद्र सरकारच्या पुढाकाराने पंतप्रधान आवास योजनेंतर्गत आर्थिक दुर्बल घटकांसाठी विविध ठिकाणी सदनिका उभारण्यात येत आहेत. या सदनिकांचा लाभ गरजू लोकांपर्यंत मिळाला पाहिजे.

सध्यस्थितीला आकुर्डी, पिंपरी येथे या योजनेतून गृहप्रकल्प उभारण्यात आला आहे. त्यामुळे सुमारे १ हजार सदनिका तयार आहेत. मात्र, त्यांचे वाटप करण्यात आलेले नाही. पिंपरी विधानसभा मतदार संघात सर्वाधिक लाभार्थी आहेत. या मतदार संघातील



गोरगरिब नागरिकांना हक्काचे घर मिळावे, अशी अपेक्षा आहे. प्रशासकीय दप्तर दिरंगाईमुळे सदनिका वाटप रखडल्याचे निदर्शनास येत आहे.

विशेष म्हणजे, चऱ्होली, बोऱ्हाडेवाडी आणि रावेत येथील गृहप्रकल्पांसाठी प्रशासनाने ५ हजार रुपयांचा डीडीसह नव्याने अर्ज मागवण्यात आले होते. त्याला शहरातून सुमारे ५० हजार नागरिकांना प्रतिसाद दिला. त्यापैकी ३ हजार ६६४ लाभार्थ्यांची यादी जानेवारी २०२१ मध्ये निश्चित करण्यात आली. मात्र, अद्याप सदनिकांचे वाटप करण्यात आलेले नाही. याबाबत प्रशासनाने खुलासा करावा. सर्वसामान्य नागरिकांच्या हक्काचे घर निश्चित वेळेत देण्याबाबत प्रशासनाने सकारात्मक भूमिका घ्यावी, अशी अपेक्षा आहे, असेही आमदार बनसोडे यांनी म्हटले आहे.

डुडूळगाव येथील प्रकल्पावरुन लोकप्रतिनिधींनी घोटाळा झाल्याचे आरोप केले आहेत. याबाबत स्थानिक प्रसारमाध्यमांमधून वृत्त प्रसिद्ध झाले आहे. संबंधित प्रकल्पाची निविदा प्रक्रिया पारदश–ीपणे राबवली पाहिजे. तसेच, या प्रकल्पात काही अनियमितता झाली असेल, तर संबंधित निविदा तात्काळ रद्द केली पाहिजे. महापालिका प्रशासनाने याबाबत सखोल चौकशी करुन ''दूध का दूध –पानी का पानी'' करावे. तसेच, चऱ्होली आणि बोऱ्हाडेवाडी येथील सदनिकांचे वाटप करण्याबाबत राज्य सरकारकडे प्रस्ताव प्रलंबित आहे. तसेच, रावेत येथील प्रकल्पाचे काम अद्याप सुरू झालेले नाही. त्यामुळे शहरातील पंतप्रधान आवास योजनेबाबत सर्वसामान्य नागरिकांमध्ये नाराजीचा सूर आहे. त्यामुळे प्रशासनाने लाभार्थ्यांना दिलासा देण्याची भूमिका घ्यावी, मागणी बनसोडे यांनी केली आहे.

# विनोद पवार मुंबई महापालिकेचे सहाय्यक जनसंपर्क अधिकारी



**पिंपरी :** ज्येष्ठ पत्रकार, विनोद पांडुरंग पवार यांची मुंबई महापालिकेच्या सहाय्यक जनसंपर्क अधिकारीपदी नियुक्ती झाली आहे. येत्या सोमवारी ते पदभार स्वीकारणार आहेत. पवार हे गेली २१ वर्षे दै. सामनाचे पिंपरी चिंचवड वरिष्ठ वार्ताहर उपसंपादक म्हणून कार्यरत होते. अतिशय अभ्यासू व मनमिळाऊ पत्रकार अशी त्यांची ओळख आहे.

# एच३एन२ आजाराबाबत स्वतंत्र उपचार केंद्र उभारण्यात यावे

**पिंपरी:** शहरातील मनपा रुग्णालयात एच३एन२ आजाराबाबत स्वतंत्र उपचार केंद्र उभारण्यात यावे. अशी मागणी माजी विरोधी पक्षनेते नाना काटे यांनी केली आहे.

यासंबंधी आयुक्त शेखर सिंह यांना दिलेल्या पत्रात म्हटले आहे की पिंपरी चिंचवड शहरात एच३एन२ या आजाराने बाधित होवून एका नागरिकाचा यशवंतराव चव्हाण रुग्णालय येथे उपचारा दरम्यान मृत्यू झाला आहे, ही गंभीर बाब आहे.

आज शहरात एच३एन२ या आजाराशी बाधित एकही रुग्ण नाही परंतु महाराष्ट्रातील इतर शहरातील या आजाराबाबत रुग्णाची वाढती संख्या पाहता नागरिकासाठी संपूर्ण पिंपरी चिंचवड शहरातील मनपा रुग्णालयामध्ये एच३एन२ या आजाराबाबत योग्य उपचार करण्यासाठी स्वतंत्र उपचार केंद्र उभारण्यात यावे, तसेच या आजारा संबधित लागणारा औषध साठा योग्य प्रमाणत वरील सर्व रुग्णालयात उपलब्ध करून देण्यात यावा.

या आजाराचा होणारा प्रसार रोखण्यासाठी खबरदारी घेवून योग्य त्या उपाययोजना करण्यात याव्या अशी मागणी काटे यांनी केली आहे

# ऑटो रिक्षा, टॅक्सी, बस, ट्रक चालकांचे प्रश्न सुटण्याचा मार्ग मोकळा

## केंद्रीय परिवहन मंत्री नितीन गडकरी यांच्यासोबत बैठक

**पिंपरी :** ऑटो रिक्षा, बस, टॅक्सी, ट्रक चालकांचे प्रश्न सुटण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. केंद्रीय परिवहन मंत्री नितीन गडकरी यांच्यासोबत संघटनेची दिल्ली येथे बैठक पार पडली. खा. शरद पवार यांच्या पुढाकाराने बाबा कांबळे यांच्या नेतृत्वाखाली देशभरातील शिस्तमंडळाने बैठक घेतली. या बैठकीमध्ये सकारात्मक चर्चा झाली शासन स्तरावर योग्य मार्ग काढून प्रश्न सोडवण्याचे आश्वासन केंद्रीय परिवहन मंत्री नितीन गडकरी आणि खा. शरद पवार यांनी दिले आहे. बैठक घेण्याचे आश्वासन खा. शरद पवार यांनी दिले होते. त्यांनी दिलेला शब्द पाळला, असे ऑटो रिक्षा टॅक्सी बस टेम्पो फेडरेशनचे राष्ट्रीय अध्यक्ष बाबा कांबळे यांनी सांगितले.

या बैठकीवेळी कश्मीर येथील जावेद अहमद शेख, मिर मोहम्मद शफी, शब्बीर अहमद, दिल्ली येथून, सुमिर अंबाबत, रवी राठोड, चिरंजीत सरोजा, महाराष्ट्र पुणे येथून



आनंद तांबे, एकनाथ ढोले, तेलंगाना येथून प्रकाश कुमार सिंह, हैदराबादचे विनय भूषण, कर्नाटकमधून रवि रेड्डी, आदींसह पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.ऑटो टॅक्सी, बस, ट्रान्सपोर्ट फेडरेशनच्या वतीने विविध रखडलेल्या मागण्यासाठी ६ मार्च रोजी दिल्ली येथे जंतर–मंतर मैदानावर आंदोलन करण्यात आले होते. राष्ट्रीय अध्यक्ष बाबा कांबळे यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात आले. या आंदोलनामध्ये देशभरातील प्रतिनिधी उपस्थित होते. या वेळी खा. शरद पवार यांनी मध्यस्थी करत मार्ग काढण्याचे आश्वासन दिले होते. त्यानुसार केंद्रीय परिवहन मंत्री नितीन गडकरी यांच्या समवेत बैठकीचे आयोजन करण्यात आले. या बैठकीत संघटनेच्या वतीने बाबा कांबळे यांनी आपले प्रश्न मांडले. ऑटो रिक्षा, टॅक्सी बस ट्रक चालक–मालकांची संख्या देशांमध्ये एकूण २३ कोटी असून, त्यांच्यासाठी राष्ट्रीय आयोग निर्माण करण्यात यावा, ड्रायव्हर दे साजरा करण्यात यावा, केंद्रीय पातळी वरती वेल्फेअर बोर्ड करण्यात यावे, टू व्हीलर टॅक्सीला कोणत्याही परिस्थितीमध्ये परवानगी देऊ नये, पंधरा वर्षाच्या स्क्रॅप पॉलिसीमध्ये वीस वर्षाचे मुदत देण्यात यावी, या सर्व विविध प्रश्नांवरती चर्चा करण्यात आली.